# छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे

## मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जातीचा दाखला प्राप्त करण्याची पध्दती

- **जातीचा दाखला काढण्यासाठी आवश्यक कागदपत्रे :** उमेदवाराचा शाळेचा दाखला किंवा बोनाफ़ाईड किंवा जन्माचा दाखला ,वडिलांचा शाळेचा दाखला किंवा बोनाफ़ाईड किंवा जन्माचा दाखला, १९६७ पूर्वीचा पुरावा म्हणून पणजोबा /आजोबा/ चुलत आजोबा / चुलते / आत्या / यांपैकी एकाचा शाळेचा दाखला, तलाठी / ग्रामसेवक यांचेकडील रहिवास पुरावा, रेशनकार्ड छायाप्रत (असल्यास), सातबारा किंवा असेसमेंट १९६६-६७ पुर्वीचा (असल्यास), आधारकार्ड छायाप्रत ,आयडेंटी साईज फ़ोटो २.

- **जातीचा पुरावा काढणे :** (१) सर्व प्रथम तुमच्या नावापुढे " मराठा / कुणबी / मराठा-कुणबी / कुणबी-मराठा " असा उल्लेख असणारा इयत्ता पहीली ते बारावी पर्यंतच्या कोणत्याही एका वर्गातील तुमचा शाळा सोडल्याचा दाखला काढा. पुर्वीच काढलेला असेल तर त्यापैकी एकाची सत्यप्रत (True Copy) घ्यावी. (२) जर तुम्हाला असा दाखला मिळाला नाही आणि तुम्ही महाविद्यालयात शिकत असाल तर तिथुन बोनाफ़ाइड सर्टिफ़िकेट काढा. परंतु बोनाफ़ाइडवर तुमची जन्मतारीख व जातीचा उल्लेख असायला हवा, याची काळजी घ्यावी.(३) तुमच्या वडिलांचा जन्म १३ ऑक्टोबर १९६७ रोजी किंवा त्यापुर्वी झाला असेल तर त्यांच्या दाखल्यावर "मराठा / कुणबी / मराठा-कुणबी / कुणबी-मराठा " अशी जात नमुद असलेला खालीलपैकी कोणताही एक पुरावा प्राप्त करावा :- (अ) पहिली ते बारावी पर्यंतचा शाळा सोडल्याचा दाखला (मुळ किंवा डुप्लीकेट) किंवा आधीच काढला असेल तर अशा दाखल्याची सत्यप्रत उपलब्ध असेल तर ती घ्यावी. (ब) जन्म – मृत्यू नोंदीचा महसुल अभिलेखातील उतारा.(आपल्या पूर्वजांचा जन्म आजोळी होत असल्यामुळे सदर गावातील १९६७ पूर्वीचा वास्तव्याचा पुरावा) (क) शासकीय, निम-शासकीय नोकरीत असल्यास सेवापुस्तकाच्या पहिल्या पृष्ठाचा संबंधित कार्यालयाने जातीची नोंद साक्षांकित केलेला उतारा. (ड) समाज कल्याण खात्याकडील जात पडताळणी समितीने वैध ठरविलेले जात वैधता प्रमाणपत्र.(४) काही कारणाने वडिलांचा जातीचा दाखला उपलब्ध होत नसेल तर,तुमच्या घरात १३ ऑक्टोबर १९६७ रोजी किंवा त्यापुर्वी जन्म झालेले तुमचे भाऊ, बहीण, चुलते, आत्या, आजोबा, किंवा वडिलांचे रक्त नाते संबंधातील व्यक्ती यापैकी कोणीही असेल तर त्याची "मराठा / कुणबी / मराठा-कुणबी / कुणबी-मराठा " अशी जात नमुद असणारा खालीलपैकी कोणताही एक पुरावा घ्या :- (अ) पहीली ते बारावी पर्यंतचा शाळा सोडल्याचा दाखला (मुळ किंवा डुप्लीकेट ) किंवा आधीच काढला असेल तर अशा दाखल्याची सत्यप्रत उपलब्ध असेल तर ती घ्यावी. (ब) जन्म – मृत्यू नोंदीचा महसुल अभिलेखातील उतारा.(आपल्या पूर्वजांचा जन्म आजोळी होत असल्यामुळे सदर गावातील १९६७ पूर्वीचा वास्तव्याचा पुरावा) (क) शासकीय, निम-शासकीय नोकरीत असल्यास सेवापुस्तकाच्या पहिल्या पृष्ठाचा संबंधित कार्यालयाने जातीची नोंद साक्षांकित केलेला उतारा. (ड) समाज कल्याण खात्याकडील जात पडताळणी समितीने वैध ठरविलेले जात वैधता प्रमाणपत्र.

- **रहिवासी व ओळखीचा पुरावा घेणे :** रेशनकार्ड किंवा स्थानिक अधिकारी यांचा रहिवास असल्याबाबतचा पुरावा किंवा विजेचे / विद्युत देयक (लाईट बिल) आकारणी पावती किंवा मतदान ओळखपत्र / पॅन कार्ड / वाहन चालविण्याचा परवाना / कॉलेज ओळखपत्र / आधारकार्ड.

- **तहसीलदार कार्यालयातुन जातीचा दाखला काढणे :** तुमच्या जातीचे, रहिवासी व ओळखीचे पुरावे घेऊन तहसीलदार कार्यालय मध्ये जावे. तेथुन जातीच्या दाखल्यासाठी आवश्यक असणारा अर्ज घ्यावा. अर्ज व्यवस्थित भरुन आवश्यक तेथे तुमची सही करावी. अर्जावर विहित मूल्यांची तिकिटे / कोर्ट फ़ी स्टॅंप लावावा. पुढिलप्रमाणे कागदपत्र जोडावीत :पुर्ण भरलेला व तिकिटे लावलेला अर्ज. रेशनकार्डची सत्यप्रत. १३ ऑक्टोबर १९६७ च्या जातीच्या पुराव्याची सत्यप्रत. साध्या को-या कागदावर जातीबाबत व वंशावळीबाबत तुमचे स्वत:चे सत्य प्रतिज्ञापत्र व त्यावर कोर्ट फ़ी स्टॅंप.(अ) अर्जदार सज्ञान असल्यास स्वत:ने केलेले प्रतिज्ञापत्र (ब) अर्जदार अज्ञान असल्यास त्याचे आई- वडील किंवा कुटुंबातील सज्ञान पालकाने अर्जदाराच्या नावाने केलेले प्रतिज्ञापत्र.

- **कार्यालयीन प्रक्रिया :** पुर्ण भरलेला व आवश्यक कागदपत्रे जोडलेला अर्ज घेऊन सेतु / महा ई सेवा केंद्रा मध्ये जावे. सेतु / महा ई सेवा केंद्र मध्ये अर्ज व त्यावरील माहिती अचुक भरली आहे का ते तपासुन घ्यावे. माहिती तपासल्यानंतर तुमच्या प्रतिज्ञापत्राची नोंदणी केली जाईल आणि तुम्हाला अर्जावर व प्रतिज्ञापत्रावर शिक्के देऊन सक्षम प्राधिका-याची सही आणण्यासाठी पाठविले जाईल. शिक्के मारलेल्या अर्जावर व प्रतिज्ञापत्रावर सक्षम प्राधिका-याची सही होईल.सही झाल्यानंतर तुमचा अर्ज सेतु / महा ई सेवा केंद्रा मध्ये जमा करावा. अर्ज जमा केल्यानंतर त्याची पोचपावती ( टोकन ) घ्यावे. सदर टोकन वर तुमचा जातीचा दाखला मिळण्याची तारीख दिली जाते. हे टोकन जपुन ठेवावे. जातीचा दाखला मिळेपर्यंत शालेय कामांसाठी हे टोकन दाखवले तरी चालते. टोकनवर दिलेल्या तारखेला येऊन टोकन दाखवुन आपला जातीचा दाखला घ्यावा व सर्व माहिती अचुक आहे का ते तपासुन पहावे. जातीचा दाखला मिळाल्यावर त्याच्या पुरेशा सत्यप्रत ( True Copy ) तयार करून ठेवावी.

- **सुचना :** (१) जर १३ ऑक्टोबर १९६७ पुर्वी जन्म झालेल्या तुमच्या वडिलांचा जातीचा पुरावा उपलब्ध असेल तर वडिलांशी तुमचे नाते दर्शवणारी वंशावळ प्रतिज्ञापत्रावर लिहुन दयावी. (२) वडिलांचा जातीचा पुरावा उपलब्ध नसल्यामुळे इतर रक्त नाते संबंधितांचे पुरावे द्यावे लागत असल्यास तुमचे आणि त्या संबंधित व्यक्तिचे नाते स्पष्ट होण्यासाठी संबंधित व्यक्तिचे आणि तुमचे नाते दर्शवणारी वंशावळ प्रतिज्ञापत्रावर लिहुन दयावी आणि त्याबद्दल काही कागदोपत्री पुरावे असल्यास ते ही द्यावेत.(३) महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक ०१ सप्टेंबर २०१२ च्या अधिसुचनेतील मुद्दा क्रमांक ३ अन्वये अर्जदार इतर तालुक्यातुन / पर जिल्हातुन / परराज्यातुन स्थंलातरित किंवा महाराष्ट्र राज्यांतर्गत स्थंलातरित झाला असल्यास, अर्जदार मानीव दिनांकास (म्हणजे १३ ऑक्टोबर १९६७ )ज्या सक्षम प्राधिका-याच्या अधिकार क्षेत्रामध्ये त्याचे वाडवडिल किंवा नातेवाईक राहत होते , त्या संबधीत सक्षम प्राधिका-याकडे जातीच्या प्रमाणपत्राकरिता अर्ज करावा.(४) १३ ऑक्टोबर १९६७ च्या पुराव्यासाठी ज्या व्यक्तीचा जातीचा पुरावा देणार आहात, त्या व्यक्तीचा जन्म ज्या ठिकाणी झाला ते ठिकाण ज्या तालुक्यात / ज्या सक्षम प्राधिका-याच्या अधिकार क्षेत्रात येते त्याकडेच तुम्हाला जात प्रमाणपत्रासाठी अर्ज करावा लागेल. (५)विवाहीत स्त्रियांसाठी प्रमाणपत्र हवे असल्यास पुढील पुरावे जोडावे : अ) विवाहपुर्वीची जात सिध्द करणारा कोणताही एक पुरावा. ब) विवाहाचा पुरावा म्हणून ग्राम सेवक / नगर पालिका / महानगरपालिका यांचेकडील विवाह नोंदणी दाखला. क) राजपत्रात (Gazzette) प्रसिध्द झालेला नावातील बदल व लग्नपत्रिका किंवा पोलिस पाटील यांचा दाखला. (६)जातीचे प्रमाण पत्र काढले तरीही Non Creamy Layer गटात मोडत नसले बाबतचे प्रमाण पत्र काढणे आवश्यक आहे, त्यासाठी तीन वर्षांचा उत्पन्नाचा दाखला लागेल जातीचे प्रमाण पत्र आणि उत्पन्नाचा दाखला , प्रतिज्ञापत्र जोडले नंतर उन्नत गटात मोडत नसले बाबतचे प्रमाण पत्र मिळेल . (७)९ मार्च २०१५ चे शासन निर्णयानुसार कागद पत्रे सत्यप्रत ऐवजी स्वयंसाक्षाकीत करता येतात, मात्र त्यासाठी स्वतंत्र स्वयं घोषणा पत्र करावे लागेल. तसेच अर्जासोबतच्या अर्जात भरलेली सर्व माहिती खरी आहे. / वंशावळीचे प्रतिज्ञापत्राऐवजी स्वयं घोषणापत्र करता येते.

- **वंशावळ कशी लिहावी ? :** मराठा जातीचा दाखला काढण्यासाठी १३ ऑक्टोबर १९६७ रोजी किंवा त्यापुर्वी जन्म झालेल्या तुमच्या रक्त नाते संबंधित व्यक्तीशी तुमचे नाते दर्शवण्यासाठी द्याव्या लागणा-या वंशावळीचे उदाहरण ...

